# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. १४७ दिनांक ०८/०६/२०२१

## वेश्या व्यवसायाकरिता मुली पुरवणा-या दलाल महिलेसह दोन आरोपी अटक. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा,नालासोपारा यांची कामगिरी

दि.०४/०६/२०२१ रोजी गुप्त बातमीदारामार्फत अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा, नालासोपारा यांना बातमी मिळाली की, वेश्यादलाल १)आयशा मंडल वय २५ वर्षे, २) महमद अली सय्यद, वय ३१ वर्षे, दोन्ही रा.ठी. पेणकरपाडा, मिरारोड पूर्व, ता.जि.ठाणे हे मुली ग्राहकास पुरवून वेश्या व्यवसाय चालवितात. सदर मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने करवाईकरीता रेस्कयू फाउन्डेशन, कांदिवली, मुंबई यांना कळवुन बोगस ग्राहक व पंच यांना पाचारण करण्यात आले.

बोगस ग्राहकाने आरोपीत महिला नामे आयशा मंडल वय २५ वर्षे हिस दोन मुली वेश्यागमनासाठी पाहिजेत असे कळविले असता आरोपीत महिलेने मुंबई अहमदाबाद हायवे रोड वरील ससुपाडा गावच्या हद्दीत एका हॉटेलच्या बाजूला ग्राहकाला थांबण्यास सांगुन ती रिक्षाने मुली घेवुन येते आहे असे सांगितले. सदर वेश्या दलाल ही मुली घेवून येणार असल्याची खात्री पटल्याने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा, नालासोपारा येथील अधिकारी व अंमलदार यांनी सापळा रचुन बोगस गि-हाईकाच्या इशा-याची वाट पहात थांबले. त्यावेळेस प्रवासी ॲटो रिक्षातून वरील दोन आरोपीत हे दोन पिडीत मुलींना घेवुन आले व बोगस ग्राहक यांच्याकडुन आरोपीतांनी पैसे स्वीकारल्याचा ईशारा मिळताच स्टाफसह सदर घटनास्थळावर छापा टाकून दोन पिडीत मुलींची सुटका करण्यात आली.वरील दोन आरोपीत तसेच रिक्षा चालक आरोपी क्र ३) संजय साव वय ३२ वर्षे रा.पेणकरपाडा मिरारोड पूर्व यांस ताब्यात घेतलेले आहे.

सदरची कामगिरी श्री.डॉ.महेश पाटील, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री.रामचंद्र देशमुख, सह पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे श्री.भास्कर नाना पुकळे,वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पो.नि/संतोष सोपान चौधरी, स.फौ/बारकु दगा चित्ते, पो.हवा/बापू महारु पवार,राजेश निवृत्ती पद्मने, साक्षी संकेत डोईफोडे, पो.ना/रोशन नारायण किणी यांनी कौशल्यपुर्ण कामगिरी करुन पिडीत मुलींची सुटका केली व आरोपीत यांना ताब्यात घेतले आहे.

...............ooooooo................